पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगाव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

**प्रेस नोट** दिंनाक २७/०२/२०२६

**प्रति,**

मा.सर्व संपादक

---------------------------

**विषय: जळगाव पोलीस दलातर्फे अवैध वाळू वाहतुकीवर विशेष प्रतिबंधात्मक कारवाई ९० हून अधिक वाहने निरुद्ध.**

जळगाव जिल्ह्यात अवैध वाळू उपसा आणि विनापरवाना वाळू वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी पोलीस दलातर्फे विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक २७/०२/२०२६ रोजी पहाटे ०५.०० वाजता जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात एकाच वेळी ही कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे.

**जळगाव उपविभागांतर्गत विशेष मोहीम**

सदर मोहिमेत जळगाव उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. नितीन गणापुरे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून कार्यवाहीचे नेतृत्व केले. या मोहिमेमध्ये जळगाव उपविभागातील सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे (LCB) अधिकारी व अंमलदार यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. जळगाव तालुका पोलीस स्टेशनच्या हद्दीतील बांभोरी, टाकरखेडे, खेडी व लगतच्या परिसरामध्ये अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या संशयित वाहनांची तपासणी करून ती ताब्यात घेण्यात आली आहेत.

**पोलीस स्टेशननिहाय कार्यवाहीचा सांख्यिकी तपशील**

अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या एकूण ९० वाहनांवर **मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम २०७** अन्वये निरुद्ध (Detain) करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. त्याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे:

- **जळगाव तालुका पोलीस स्टेशन:** ३२ ट्रॅक्टर आणि ०८ डंपर (एकूण ४० वाहने).
- **कासोदा पोलीस स्टेशन:** १५ ट्रॅक्टर.
- **भडगाव पोलीस स्टेशन:** १३ ट्रॅक्टर आणि ०१ डंपर.
- **एरंडोल पोलीस स्टेशन:** ०४ ट्रॅक्टर आणि ०१ डंपर.
- **मेहुणबारे पोलीस स्टेशन:** या ठिकाणी १५ ट्रॅक्टर आणि ०१ वाळूने भरलेला ट्रॅक्टर मिळून आला. याप्रकरणी मेहुणबारे पोलीस स्टेशन येथे **गुन्हा रजिस्टर क्रमांक ४४/२०२६, भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम ३०३(२)** अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे.

**मोटार वाहन अधिनियम १९८८ - कलम २०७ अन्वये वैधानिक कार्यवाही**

अवैध वाळू वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून संबंधित कायद्यातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करण्यात आली आहे. या अंतर्गत खालील बाबींची पडताळणी करण्यात येते:

- **दस्तावेज पडताळणी:** संशयास्पद स्थितीत आढळलेल्या वाहनांचा वाहतूक परवाना (Permit), नोंदणी प्रमाणपत्र (RC) आणि चालकाचा परवाना (DL) यांची सखोल तांत्रिक पडताळणी करण्यात आली.

- **वाहन निरुद्ध करण्याची प्रक्रिया:** ज्या वाहनांकडे विहित कायदेशीर कागदपत्रे उपलब्ध नव्हती किंवा ज्यांनी परवान्यातील अटींचे उल्लंघन करून अवैध वाहतूक केली, अशी वाहने कलम २०७ मधील अधिकारांचा वापर करून जागेवरच जप्त करून पोलीस स्टेशनच्या ताब्यात निरुद्ध करण्यात आली आहेत.

जिल्हा पोलीस प्रशासनातर्फे नैसर्गिक साधनसंपत्तीची अवैध चोरी करणाऱ्या घटकांविरुद्ध ही मोहीम यापुढेही निरंतर सुरू राहील, असा प्रशासकीय इशारा देण्यात आला आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**जळगाव जिल्हा पोलीस दल**